राज्यात जागतिक बँक सहाय्यित "महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर (Maharashtra Urban Water Supply, Sanitation and Reuse Program MUWREP)" प्रकल्पाच्या अंमलबजावणीस मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- MUWREP-२०२६/प्र.क्र.७९/ नवि-३३**

**मंत्रालय, मुंबई -४०००३२**

**दिनांक - १० एप्रिल, २०२६**

**संदर्भ -:**

१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अमृत-२०२२/प्र.क्र.१४१/नवि-३३, दिनांक १४ जुलै, २०२२.

२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक नगरो-२०२३/प्र.क्र.३८९/नवि-३३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४.

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९७/नवि-३३, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यात ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था असून सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ४८ टक्के लोकसंख्या नागरी भागात आहे. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर हा जल संसाधनांवरील ताण कमी करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. त्यामुळे वर्तमान वापरासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याची सुरक्षा सुनिश्चित करता येईल.

प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याच्या सुरक्षित पुनर्वापरास, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील धोरणानुसार चालना देण्यासाठी आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यापासून, पाण्याची व पर्यावरणीय सुरक्षा, सामाजिक-आर्थिक फायदे विचारात घेऊन संस्थात्मक उभारणी करणे, विविध यंत्रणांची जबाबदारी निश्चित करणे व प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराबाबत पाठपुरावा करणे व प्रभावी पुनर्वापरास प्रोत्साहन देणे आणि नागरी क्षेत्रामध्ये अपुरी वापर क्षमता, सांडपाणी वितरण व्यवस्थेची कमतरता व वाढती शहरी लोकसंख्या पाहता एकूण सांडपाणी निर्मिती व सांडपाणी प्रक्रिया यांच्यातील तूट भरून काढणे, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरास चालना देत वर्तुळाकार अर्थव्यवस्थेला गती देण्याच्या अनुषंगाने जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना नगर विकास विभाग (नवि-२) व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**२. धोरणाचा उद्देश :**

नागरी भागातील पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनाची वाढती गरज विचारात घेता नागरी भागातील कमाल लोकसंख्येस जलशाश्वती उपलब्ध करुन देणे, नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन नदीपात्रात सोडणे व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा विविध प्रयोजनासाठी इष्टतम पुनर्वापर करणे, सदर प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी प्रकल्पाच्या कार्यान्वयनातून महसुल निर्मिती करून वर्तुळाकार अर्थव्यवस्थेस चालना देणे, सदर प्रकल्पांसाठी विविध वित्त पुरवठ्याच्या मॉडेल (Financing Model) व्दारे जसे की, Blended finance, PPP, Annuity मॉडेल, पुल्ड बाँड्स इ. संदर्भात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उभारण्यास मदत करणे, त्यासोबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक क्षमता वाढविणे हे सदर प्रकल्पाचे उद्देश आहेत.

**३. महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना** )Maharashtra Urban Water Supply, Sanitation and Reuse Program - MUWREP) **मध्ये समाविष्ट घटक :-**

**i. नागरी पाणीपुरवठा व्यवस्थापन व सेवांची कार्यक्षमता, गुणवत्ता व टिकाव वाढविणे :-**

- निवडलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाणीपुरवठा व्याप्ती वाढवणे, २४/७ पाणीपुरवठा, Non-Revenue Water कमी करणे, वॉटर मिटरिंग, उपभोक्ता शुल्क वसुली कार्यक्षमता आणि कॉस्ट रिकव्हरी सुधारण्यासाठी प्रोत्साहनाधारित अनुदाने.
- विद्यमान मालमत्तेचा पूर्ण उपयोग (retrofitting dysfunctional water assets), सार्वत्रिक घरगुती नळजोडण्या व उत्तम O&M पद्धतींना प्राधान्य देणे.

**ii. सांडपाणी प्रक्रिया, पुनर्वापर व गाळ (Sludge) व्यवस्थापन :-**

- निवडलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (ULBs) सांडपाणी संकलन यंत्रणा, पंपगृहे व सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (STPs) यासाठी भांडवली गुंतवणूक.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व-नियोजित पाण्याचा वापर, औद्योगिक व कृषी उपयोगासाठी पुनर्वापर करण्यासाठी पायाभूत सुविधा (वाहिन्या, साठवण क्षमता, सुविधा) उभारणी.

**iii. नागरी पाणीपुरवठा व्यवस्थापन व सांडपाणी प्रक्रिया, पुनर्वापर व गाळ (Sludge) व्यवस्थापन संबंधित शासनाच्या धोरणांनुसार प्रक्रिया, सह-प्रक्रिया (co-processing) व आर्थिक मूल्यनिर्मिती (monetization) :-**

- बँकेबल प्रकल्पांसाठी नगरपरिषद/महानगरपालिकांना (ULBs) व्यवहार्यता-अंतर निधी (VGF), क्रेडिट-एन्हान्समेंट (credit enhancement) व ट्रान्झॅक्शन ॲडव्हायझरी सहाय्य उपलब्ध करून देणे.
- महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी (MUINFRA) मध्ये वित्तीय साधनांच्या माध्यमातून पूल बाँड्स/कर्ज, PPP प्रकल्प, हमी योजना (guarantees) यासाठी आवश्यक वित्तीय चौकटींची स्थापना करणे.
- केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड व इतर योजनांच्या अनुषंगाने खाजगी भांडवल उभारणीकरिता नगर विकास विभाग व MUINFRA मार्फत सहाय्य करणे.

iv. **संस्थात्मक बळकटीकरण, धोरणे व प्रणाली विकास :-**

- सांडपाण्याचा पुनर्वापर शुल्क/ दर (tariffs), गाळाचे आर्थिक मूल्यनिर्मिती (sludge monetization) व मालमत्ता व्यवस्थापन यांसाठी आवश्यक धोरणे व नियामक चौकट विकसित करण्याकरिता नगर विकास विभाग-२, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि MUINFRA यांना सहाय्य करणे.
- MUINFRA स्तरावर तांत्रिक व आर्थिक क्षमता-वृद्धी साठी तज्ञ सल्लागारांची नियुक्ती तसेच, MUINFRA च्या माध्यमातून राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी म्युनिसिपल बॉण्ड्स, पूल्ड म्युनिसिपल बॉण्ड्स आदि अभिनव पर्यायांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहाय्य करणे.
- PMU व PIU यांना कर्मचारी व्यवस्था, तज्ज्ञ सल्लागार, व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS) आणि इतर तांत्रिक सहाय्य करणे.
- क्षमता-वृद्धी, standard bidding documents, model contracts, प्रगत तंत्रज्ञानांसाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यप्रदर्शन-आधारित O&M पद्धतींसाठी मार्गदर्शन करणे.

**४. प्रकल्प सादर करण्याची कार्यपद्धती :-**

या योजनेंतर्गत प्रस्तावित प्रकल्पांना मंजूरी नगर विकास विभागाकडून देण्यात येईल व सदर योजनेंतर्गत समितीसमोर सादर करण्यात येणारे प्रकल्प नोडल एजन्सी असलेल्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत विभागास सादर करण्यात यावेत.शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावास प्रथम नगरोत्थान महाभियानाच्या राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीमार्फत मान्यता देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

**५. प्रकल्प संचालक (PD) व सह आयुक्त :-**

५.१ नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय प्रकल्प संचालक (PD) राहतील. नगरपरिषद प्रशासन संचालनालय व महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी स्तरावर प्रत्येकी एक प्रकल्प सहआयुक्त म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५.२ पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प संचालक (PD) राहतील.

**६. प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा :-**

सदर योजनेंतर्गत प्रकल्पांसाठी खालीलप्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात येत आहेत व त्यांची कार्यकक्षा व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आहेत.

i. **योजनेच्या एकूण समन्वय व संनियंत्रण करणेकरिता प्रकल्प समन्वय समिती** (Project Monitoring and Appraisal Committee-PMAC) :-

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री नगर विकास विभाग | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | सह-अध्यक्ष |
| ३ | मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | सह-अध्यक्ष |
| ४ | मा.मुख्य सचिव | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), MITRA तथा मा. मुख्यमंत्री यांचे मुख्य | सदस्य |

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| | आर्थिक सल्लागार | |
| ६ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग. | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. | सदस्य |
| ९ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग-२ | सदस्य सचिव |
| १० | आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय | विशेष निमंत्रित सदस्य |
| ११ | कार्यक्रम संचालक, MUWREP | |
| १२ | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | |

**समितीची कार्यकक्षा :-**

- कार्यक्रमाचा समन्वय व सनियंत्रण करणे.
- वार्षिक अंमलबजावणी आराखड्यांना मंजूरी देणे तसेच, ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरालगतच्या भागांचा समावेश करणे.

ii. **मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती व कार्यकक्षा** (State Steering Committee - SSC) :-

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), MITRA | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग-२ | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ७ | सह-मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा (MITRA) | सदस्य |
| ८ | नगर विकास विभागामार्फत (नवि-२) राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग-२ यांनी नामनिर्देशित केलेले सह / उपसचिव दर्जाचे अधिकारी (नवि-२) / पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य सचिव |
| ९ | निमंत्रित सदस्य | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा :-**

- सदर योजनेंतर्गत रुपये १०० कोटी किंमतीपेक्षा अधिक किंमतीच्या प्रकल्पांच्या प्रशासकीय मंजूरी देणे.
- सदर योजनेंतर्गत रुपये १०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या प्रकल्पांच्या निविदांना अंतिम मंजूरी देणे.
- शहरांची निवड व निकष निश्चिती / सुधारित करणे.
- सदर योजनेंतर्गत आवश्यकतेनुसार समिती नेमणे अथवा नेमलेल्या समित्यांच्या कार्यकक्षांमध्ये बदल/ सुधारणा करणे.
- विविध विभागांमध्ये वाद निर्माण झाल्यास त्यांमध्ये समन्वय राखण्याचा अंतिम अधिकार.
- सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक अशा इतर बाबींना मान्यता देणे.
- सदर योजनेतील आवश्यक बाबींमध्ये सुधारणा करणे आणि योजनेचे वेळोवेळी संनियंत्रण करणे.

iii. **प्रकल्प समन्वय समिती** (Project Coordination Committee-PCC) :-

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग-२ | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ५ | प्रकल्प संचालक तथा आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई | सदस्य |
| ६ | सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळ अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य |
| ७ | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ८ | सह-मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा (MITRA) | सदस्य |
| ९ | नगर विकास विभागामार्फत (नवि-२) राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नगर विकास विभाग-२ यांनी नामनिर्देशित केलेले सह / उपसचिव दर्जाचे अधिकारी (नवि-२) / पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी नामनिर्देशित केलेले सह / उपसचिव दर्जाचे अधिकारी | सदस्य सचिव |
| १० | निमंत्रित सदस्य | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा-:**

- सदर योजनेचे समन्वयन करणे.
- योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांमधील समन्वय करणे.
- योजनेच्या वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करुन शासनास शिफारस करणे.

- योजनेच्या अंमलबजावणीतील विविध अडचणींचे निराकरण करणे.
- प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) यांच्या कामकाजाची देखरेख व आवश्यक नियंत्रण करणे.
- योजनेंतर्गत रुपये १०० कोटींपर्यंतच्या प्रकल्पांच्या प्रशासकीय मान्यता देणे.
- योजनेंतर्गत रुपये १०० कोटींपर्यंतच्या प्रकल्पांच्या निविदांना अंतिम मंजुरी देण्याची कार्यवाही करणे.

iv. **प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा :-**

- **सर्व महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपरिषद :-** यांच्या कार्यक्षेत्रात प्रस्तूत प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची अंमलबजावणी यंत्रणा ही नगर विकास विभागामार्फत निश्चित करण्यात येईल.
- **"ब", "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत :-** यांच्या कार्यक्षेत्रात प्रस्तूत प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांची अंमलबजावणी यंत्रणा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राहील.

v. **प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU - १) : समन्वय व देखरेख**

- आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे या कक्षाचे प्रमुख असतील.
- सदर कक्षामध्ये आवश्यक सदस्यांची निवड / नेमणुक आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडून करण्यात येईल.
- **कार्यकक्षा :** कार्यक्रमाचा एकूण समन्वय, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सविस्तर प्रकल्प अहवालावर (DPR) अभिप्राय संकलित करणे, धोरणात्मक कार्यवाही, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अहवालांचे संकलन व प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक इतर सहाय्य. प्रकल्पाच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे वेळोवेळी मूल्यमापन करणे.

vi. **तांत्रिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PTMU) :-**

- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे या कक्षाचे प्रमुख असतील.
- **कार्यकक्षा :** सविस्तर प्रकल्प अहवालांचे तांत्रिक परीक्षण व मूल्यांकन, डिझाइन सहाय्य, PIU ना अंमलबजावणी व खरेदी प्रक्रियेसाठी (procurement) आवश्यक सहाय्य, Darft Tendar Documents राज्यस्तरीय तांत्रिक मानके, गुणवत्ता नियंत्रण, पर्यावरणीय व सामाजिक संरक्षक उपाययोजना (Environment and Social safeguards)

vii. **आर्थिक सक्षमीकरण व क्षमतावर्धन कक्ष - (PMU -२) :-**

- महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित- MUINFRA स्तरावर कार्यरत असेल.
- **कार्यकक्षा** : जागतिक बँक व जागतिक बँकेने वेळोवेळी निर्देशित केलेल्या संस्थांच्या सहाय्याने नागरी स्थानिक संस्थांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी क्षमता-वृद्धी सुनिश्चित करणे, म्युनिसिपल बॉण्ड्स, पीपीपी प्रकल्प, हमी योजना, transaction advisory, पुल्ड बॉण्ड्स ई. वित्तीय साधनांसंदर्भात नागरी स्थानिक संस्थांना सहाय्य प्रदान करणे, सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी, अर्बन चॅलेंज फंड व केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सहाय्य प्रदान करणे.
- MUWREP अंतर्गत जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ (IFC) यांच्या संयुक्त विद्यमाने MUINFRA च्या कार्यकक्षांचा विस्तार, क्षमता-वृद्धी व मनुष्यबळ वाढविणे आदी उपक्रम राबविण्यात येतील.

viii. **ज्ञान व्यवस्थापन कक्ष** (Knowledge Management PMU) – MITRA :-

- सदर प्रकल्प व्यवस्थापन कक्ष Maharashtra Institute for Transformation (MITRA) अंतर्गत स्थापन करण्यात येणार असून पुर्णवेळ कार्यक्रम उप संचालक हे या कक्षाचे प्रमुख असतील. सदर कक्षामध्ये आवश्यकतेनुसार अभियांत्रिकी, अर्थ, पर्यावरण/संरक्षण आणि सामाजिक विकास या बाबींमध्ये तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती नगर विकास विभाग (नवि-२) यांच्या समवेत विचार विनिमय करुन करण्यात येईल. जागतिक पातळीवरच्या good practices चे संकलन करणे, यशस्वी कार्यक्रमांचे विश्लेषण करून त्या आधारे राज्यस्तरीय पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाच्या धोरणांमध्ये सुधारणा करण्यास नगर विकास विभागास शिफारस करणे.
- **कार्यकक्षा :** Results framework, सुधारणा कार्यक्रम, Monitoring & Evaluation, विदा प्रणाली (Data System), आर्थिक मूल्यांकन, राज्याच्या वित्त व नियोजन विभागाच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या आर्थिक उपक्रम विभागाशी समन्वय (DEA) राखणे, ज्ञान व्यवस्थापन व बाह्य भागीदारांसह समन्वय करणे.

ix. **प्रकल्प अंमलबजावणी कक्ष** (Project Implementation Units – PIUs) :-

- सहभागी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांच्या स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात येईल.
- संबंधीत प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे प्रमुख संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे आयुक्त / मुख्याधिकारी असतील. तसेच,नगरपालिका/महानगरपालिकेतील संबंधित विभाग प्रमुख व संबंधित कार्यक्षेत्रातील पोलिस, रेल्वे, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण यांचे प्रतिनिधी प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे सदस्य असतील.
- **कार्यकक्षा :**
  - प्रकल्प तयारी ते खरेदी प्रक्रिया (procurement)
  - करार व्यवस्थापन
  - पर्यावरणीय व सामाजिक संरक्षण उपायांची अंमलबजावणी
  - भागधारक सल्लामसलत/संवाद (stakeholder engagement)
  - कार्यचलन व देखभाल (O&M) याबाबतचे नियोजन
  - उपरोक्त कामकाजाचे नियमित अहवाल या योजनेशी संबंधीत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे सादर करणे.

x. **प्रकल्प मान्यतेची कार्यपध्दती :-**

महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजना (MUWREP) अंतर्गत प्रकल्पांच्या मान्यतेसाठी नगर विकास विभाग (नवि-२) नोडल विभाग म्हणून काम करेल व या अभियानंतर्गत प्रकल्पांचे समन्वयन व संनियंत्रण करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असेल. शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावास प्रथम नगरोत्थान महाभियानाच्या राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीमार्फत मान्यता देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

xi. **कर्ज फेडण्यासाठीची वित्तीय यंत्रणा :-**

या प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थासोबत आवश्यक समन्वयन करण्यासाठी आणि इतर आवश्यक वित्तीय बाबींसाठी MUINFRA नोडल यंत्रणा म्हणून काम करेल.

**xii. प्रकल्प निवडीची प्रक्रिया :-**

सदर योजनेंतर्गत नगरपरिषद प्रशासन संचालनालयातर्फे प्रस्तावित प्रकल्पांना मंजूरी नगर विकास विभागाकडून (नवि-२) देण्यात येईल. नगरोत्थान महाभियानाअतंर्गत व केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत अनुक्रमे तांत्रिक मान्यता प्राप्त झालेल्या परंतु निधी अभावी प्रशासकीय मान्यता प्रलंबित असलेल्या, प्रगतिपथावर असलेल्या प्रकल्पांना MUWREP अंतर्गत प्राधान्य देण्यात येईल.

**७. प्रकल्पाचे वित्तीय नियोजन :-**

i. सदर योजनेंतर्गत प्रकल्पांसाठी साधारणपणे रक्कम ७१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर निधीची उपलब्धता असणार आहे त्यापैकी ७० टक्के म्हणजेच सुमारे रक्कम ५०० दशलक्ष अमेरीकन डॉलर एवढा निधी जागतिक बँकेकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होणार असून उर्वरित ३० टक्के म्हणजेच सुमारे रक्कम २१५ दशलक्ष डॉलर निधी राज्य शासन अथवा संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उभारण्यात येणार आहे.

ii. सदर प्रकल्पासाठी राज्य हिश्यापोटी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी या योजनेसाठी उघडलेल्या वेगळ्या लेखाशिर्षाखाली निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी अतिरीक्त नियतव्यय नियोजन व वित्त विभागाकडून उपलब्ध निधी या योजनेच्या राज्य हिश्यापोटी अथवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था हिश्यापोटी उपलब्ध करुन देण्यात येईल.

iii. सदर योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी उभारावयाच्या भांडवलासाठी प्रकल्पनिहाय उचित वित्तीय मॉडेल राहील.

**८. प्रकल्पाचा कालावधी :-** सदर प्रकल्पाचा मंजूरी नंतर कालावधी ६ वर्ष असेल.

**९. इतर बाबी :-**

i. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून आवश्यक निधी या विभागाच्या नियमित नियतव्यया व्यतिरीक्त नियोजन व वित्त विभागाकडून उपलब्ध करून देण्यात यावा. याकरिता नगर विकास विभाग व पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने स्वतंत्र लेखाशीर्ष घेण्याची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

ii. राज्याच्या Treated Wastewater Management and Reuse Policy-२०२५ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यप्रदर्शन-आधारित प्राधान्य देणे तसेच Life Cycle Costing - आधारित मूल्यांकन, O&M, सांडपाणी पुनर्वापराची व्यवहार्यता विचारात घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

iii. प्रस्तुत प्रकल्पातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा नगरोत्थान महाभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दर्जाप्रमाणे ठरविण्यात येईल.

iv. सदर योजनेंतर्गत प्रकल्पामुळे उद्भवणाऱ्या भविष्यातील आर्थिक भार, संचालन व देखभाल खर्च (O&M Cost) संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात यावा.

v. प्रकल्प राबविताना भूसंपादन, पुनर्वसन व पर्यावरणीय मंजूरी किंवा अन्य कोणत्याही बाबीमुळे उद्भवणारा अतिरिक्त खर्च संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात यावा.

vi. प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान खर्चवाढ (Cost Escalation) झाल्यास त्याची जबाबदारी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील व यासाठीचा निधी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभारावा.

vii. प्रस्तुत प्रकल्प जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्यावर अवलंबून असल्याने केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वित्तीय उपक्रम विभागाने दिनांक १६ मे, २०१७ रोजी निर्गमित केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार प्रकल्पाशी संबंधित कर्जाचा व्याज दर व परतफेडीचा कालावधी ठरविण्यात येईल.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०४१०१८१३३५८३२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.10 18:14:54 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुद्धे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (सर्व) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), MITRA.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियामक मंडळ, मुंबई.
१४. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), MITRA.
१५. व्यवस्थापकीय संचालक, MUINFRA.
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई.
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
१८. विभागीय आयुक्त सर्व.
१९. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
२०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
२१. जिल्हाधिकारी सर्व.
२२. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
२३. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/नगरपंचायत.
२४. निवड नस्ती, नवि-३३.